यशवंतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ./स्वापाशा/स्वयंअशाळा/७५९/२०१
पुणे- १ दिनांक ३० ०५ ०

प्रति,

अध्यक्ष/सचिव/मुख्याध्यापक,

एज्युकेशन रिर्सच अकॅडमी औरंगाबाद संचालित इरा इंटरनॅशलन स्कूल गुणवडी रोड बारामती

विषय ः सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षापासुन महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्याबाबत.

संदर्भ ः १. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र.१,६ व २४) २०१३

2.शासन निर्णय क्रमांक एसएफएस 1016प्र क्र 69एसएम 2 दिनांक 17/6/2016

3.शिक्षण उपसंचालक,पुणे जा.क्र.शिउसं/प्राथ-२/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/१६९२४दिनांक २७जुलै२०१६

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने नविन शाळा करण्याकरिता प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्र. २ च्या निर्णयानुसार खालील अटी व शर्तीवर विद्यमान प्राथमिक शाळेस प्राथमिक इ.१ ली ते इ.५ वी प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नाव व पुर्ण पत्ता | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पुर्ण पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा / दर्जावाढ | मान्यता वर्ग व इयत्ता | वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | एज्युकेशन रिर्सच अकॅडमी प्लॉट नं ७० संन ७८ कामगार चौक एन २ सी आय डी सी ओ औरंगाबाद | इरा इंटरनॅशलन स्कूल मु पो बारामती ता बारामती जि पुणे गुणवडी रोड बारामती | इंग्रजी | नविन शाळा (सी बी एस सी) स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर | प्राथमिक शाळा इ.१ली ते इ.८वी | २०१६-१७ |

अटी व शर्ती

१. संस्थेने वर्ग परवानगीसाठी विहीत केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इ. मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.

२. शासनाने ज्या ठिकाणासाठी नविन शाळा परवानगी दिलेली आहे. त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी वर्ग सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

३. या अधिनियमातील तरतुदीनूसार वर्ग करण्यास दिलेली परवानगी दिलेली आहे.

४. संदर्भ क्रमांक .०२ अन्वये सन २०१७-१८ मध्ये नविन शाळा परवानगी देण्यात येत आहे. परवानगी मिळाल्या पासून अठरा महिन्याच्या आत वर्ग सुरू न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.

५. परवानगी देण्यात आलेल्या वर्ग शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशाचे, कार्यपद्धतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहिल.

६. शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील.

७. शासन निर्णय एसएफएस-२०१८/प्र.क्र.१३४६/एसएम-२ दि.१६.११.२०१८ मील अटी शर्तीतील मद्दा क्र.२ चे कायम पूर्ततेच्या अधिन राहून मान्यता देणेत येत आहे.

८. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांना भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.

९. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१३ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना मध्ये माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यित वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.

१०. शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहीत करेल अशा नियमाची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद, पुणे